# १७ वा अमरावती परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळावा समारोप सोहळा थाटात संपन्न

१७ व्या पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजनाचा मान यंदा वाशिम जिल्हा पोलीस दलाला मिळाला होता. त्याअनुषंगाने दिनांक १९/०८/२०१९ ते २१/०८/२०१९ यादरम्यान मोठया थाटात सदर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. दि १९/०८/२०१९ रोजी वाशिम जिल्हयाचे जिल्हाधिकारी हृषिकेश मोडक यांचे हस्ते पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी व अपर पोलीस अधिक्षक विजयकुमार चव्हाण यांचे उपस्थितीत सदर पोलीस कर्तव्य मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले होते. ३ दिवस चालणा—या या कर्तव्य मेळाव्यामध्ये अमरावती ग्रा.अकोला,बुलढाणा,यवतमाळ,वाशिम येथील ११२ स्पर्धक ज्यामध्ये ३२ पोलीस अधिकारी व ८० कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. सदर स्पर्धेत पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांचे कौशल्याची चाचणी व व्यावसायिक गुणवत्ता सुधारण्यासाठी पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

अमरावती परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळावा मध्ये घातपात विरोधी तपासणी, पोलीस व्हीडीओग्राफी ,फोटोग्राफी श्वानपथकाच्या कामगीरीचा समावेश करण्यात आला होता. ३ दिवस झालेल्या विविध स्पर्धेमध्ये वाशिम जिल्हा पोलीस दलाने उल्लेखनिय कामगिरी करत ५ सुवर्ण पदक व १ कांस्य पदक मिळवत अव्वल येण्याचा मान मिळविला. तर व्दितीय क्रमांक १ सुवर्ण पदक व ३ कांस्य पदकासह अमरावती ग्रामीण व ३ रौप्य व १ कांस्य पदकासह अकोला जिल्हा तृतीय क्रमांकावर राहीला. सदर स्पर्धेची जनरल चॅम्पीयनशिप वाशिम जिल्हा पोलीस दलाने पटकावली.तसेच विजयी स्पर्धकांना अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक श्री मकरंद रानडे यांचे हस्ते पदक देउन गौरविण्यात आले.

१७ व्या अमरावती परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळाव्याचे समारोप सोहळा वाशिम जिल्हाचे नवीन पोलीस मुख्यालय कवायत मैदान येथे अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक श्री मकरंद रानडे यांचे प्रमुख उपस्थित व जिल्हा पोलीस अधिक्षक वसंत परदेशी ,अपर पोलीस अधिक्षक विजयकुमार चव्हाण तसेच इतर मान्यवर यांचे उपस्थितीत आज पार पडला.

पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम